# बृहन्मुंबई गणित अध्यापक मंडळ, मुंबई

दिनांक : 26-7-2025

## गणित संबोध परीक्षा 2025

वेळ : 3 ते 5

इयत्ता : 5 वी / 6 वी

गुण : 100

---

सूचना :
1) प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका स्वतंत्र आहेत.
2) प्रश्नपत्रिकेच्या प्रत्येक पृष्ठावरील दिलेल्या मोकळ्या जागेत कच्चे काम करा.
3) उत्तरपत्रिकेस घडी घालू नका.
4) योग्य पर्याय उत्तरपत्रिकेवर बॉलपेनने पुढीलप्रमाणे रंगवा.

उदाहरणार्थ : मार्च महिन्याचे दिवस किती ?

A) 30 B) 31 C) 29 D) 28

अचूक उत्तर B आहे म्हणून उत्तरपत्रिकेत पुढीलप्रमाणे रंगवा.

A) (B) C) D)

---

1. एकोणनव्वद हजार पाच ही संख्या अंकांत लिहा.

(A) 8,90,005 (B) 8,905 (C) 89,005 (D) यापैकी नाही.

2. $5\underline{9},\underline{9}03$ या संख्येतील अधोरेखित अंकांच्या स्थानिक किंमतीतील फरक किती ?

(A) 0 (B) 8,100 (C) 100 (D) 1,000

3. 9,723 या संख्येचे वेगवेगळे अर्थ खाली दिले आहेत. त्यांपैकी बरोबर अर्थ कोणते ?

(a) नऊ हजार, सात शतक, दोन दशक, तीन एकक

(b) सत्त्याण्णव शतक, दोन दशक, तीन एकक

(c) नऊशे बहात्तर दशक, तीन एकक

(d) सत्त्याण्णवशे तेवीस एकक

(A) सर्व अर्थ बरोबर (B) b, c, d (C) a, b (D) a, c, d.

4. दिलेले अंक व स्थाने यांवरून संख्या लिहा.

7 द.ह., 5 ह., 4 श., 2 ए.

(A) 7,542 (B) 75,402 (C) 70,542 (D) 7,05,402

5. 60,503 ही संख्या विस्तारित रूपात लिहा.

(A) 60 + 5 + 0 + 3 (B) 60 + 500 + 3

(C) 60,000 + 50 + 3 (D) 60,000 + 500 + 00 + 3

6. 


शेजारील आकृतीत,
घड्याळाच्या दोन काट्यांमध्ये कोणत्या प्रकारचा कोन होतो ?

(A) लघुकोन (B) काटकोन (C) सरळकोन (D) विशालकोन

7. एका तारेचा त्रिकोण तयार केला आहे. त्या त्रिकोणाच्या बाजू 4.5 सेमी, 6 सेमी आणि 3 सेमी असतील तर त्या तारेची लांबी किती?

(A) 81 सेमी (B) 5.4 सेमी (C) 13.5 सेमी (D) 40.5 सेमी

8. पुढील संख्या चढत्या क्रमाने लिहा –
79,038, 97,830, 98,730, 90,378

(A) 98,730, 97,830, 90,378, 79,038 (B) 79,038, 90,378, 97,830, 98,730

(C) 97,830, 98,730, 90,378, 79,038 (D) 79,038, 98,730, 90,378, 97,830

9. पुढील आकृतिबंध पूर्ण करा.
2, 9, 16, ______, 30, ______, 44

(A) 23, 37 (B) 27, 34 (C) 21,35 (D) यांपैकी नाही.

10. खालीलपैकी कोणत्या आकृत्या सममित आहेत ?



a b c d

(A) a, b (B) a,b,c (C) a (D) चारही

11. खालीलपैकी कोणती संख्या एक लाखापेक्षा शंभरने लहान आहे ?

99,900, 99,090, 99,990, 99,890

(A) 99,090 (B) 99,900 (C) 99,890 (D) 99,990

12. $\frac{3}{4}$ डझन म्हणजे किती वस्तू ?

(A) 8 (B) 6 (C) 3 (D) 9

13. पुढील बेरजेत P, Q च्या जागी कोणते अंक असावेत ?

$$\begin{array}{r} 6\,P\,7\,2 \\ +\;3\,4\,8\,9 \\ \hline Q\,9\,6\,1 \end{array}$$

(A) $P=9, Q=8$ (B) $P=9, Q=4$

(C) $P=5, Q=8$ (D) $P=4, Q=9$

14. बेरीज करा :- 6,392 + 50,387

(A) 1,14,307 (B) 1,14,207 (C) 5,06,779 (D) 56,779

15. वजाबाकी करा :- 50,802 – 32,815

(A) 18,097 (B) 17,987 (C) 17,997 (D) 28,097

16. एका चौरसाची बाजू एक पूर्णांक संख्या असेल तर खालीलपैकी कोणती संख्या चौरसाची परिमिती दर्शवते ?

(A) 17 सेमी (B) 52 सेमी (C) 25 सेमी (D) 42 सेमी

17. घडयाळात पावणेबारा वाजले म्हणजे कोणती वेळ?

(A) 12 वाजून 15 मिनिटे (B) 11 वाजून 15 मिनिटे

(C) 11 वाजून 25 मिनिटे (D) 11 वाजून 45 मिनिटे

18. योग्य चिन्ह चौकटीत लिहून पुढील अपूर्णांकांची तुलना करा.

$\frac{5}{7}$ $\square$ $\frac{5}{11}$

(A) < (B) > (C) = (D) सांगता येणार नाही.

19. बाजूच्या आकृतीत M व N केंद्र असलेली दोन वर्तुळे आहेत.
M, P, N हे बिंदू एकाच सरळ रेषेवर आहेत. MP व NP ह्या त्रिज्या आहेत.
M केंद्र असलेल्या वर्तुळाचा व्यास 12 सेमी तर
N केंद्र असलेल्या वर्तुळाचा व्यास 6 सेमी असल्यास MN या रेखाखंडाची लांबी किती?




(A) 9 सेमी (B) 5 सेमी (C) 8 सेमी (D) 7 सेमी

20. खालील संख्यांच्या गुणाकाराच्या एकक स्थानी कोणता अंक असू शकेल ?
$11 \times 12 \times 13 \times 14 \times 16 \times 17$
(A) 7 (B) 6 (C) 9 (D) 8

21. पुढील अपूर्णांक उतरत्या क्रमाने लिहिल्यास दुसरा अपूर्णांक कोणता असेल ?
$\frac{4}{12}$, $\frac{4}{9}$, $\frac{4}{13}$, $\frac{4}{7}$, $\frac{4}{5}$
(A) $\frac{4}{7}$ (B) $\frac{4}{12}$ (C) $\frac{4}{9}$ (D) $\frac{4}{5}$

22. 5,732, 6,903, 86,421, 5,555 या चार संख्यांपैकी एकूण किती संख्या विषम आहेत ?
(A) 2 (B) 1 (C) 3 (D) सर्वच

23. 1 ते 75 या संख्यांच्या दरम्यान किती सम संख्या आहेत ?
(A) 17 (B) 73 (C) 75 (D) 37

24. एका टाकीत जास्तीत जास्त 35 लिटर पाणी राहते. जर त्या टाकीत 15 लिटर पाणी असेल तर टाकीचा किती भाग रिकामा असेल ?
(A) $\frac{3}{7}$ (B) $\frac{5}{7}$ (C) $\frac{2}{7}$ (D) $\frac{4}{7}$

25. 17 रांगांत प्रत्येकी 17 मुलगे उभे आहेत. जर प्रत्येक रांगेत एक मुलगा वाढला तर एकूण किती मुलगे होतील ?
(A) 289 (B) 324 (C) 306 (D) 269

26. जिन्याच्या खालून 17 व्या पायरीवर अरुण उभा आहे. जर ती पायरी वरून 13 वी असेल तर त्या जिन्याला एकूण किती पायऱ्या असतील?

(A) 30 (B) 29 (C) 28 (D) यापैकी नाही.

27. मला 5 रुपयांचे सुटे पुढील सर्व प्रकारच्या नाण्यांत हवे आहेत. 50 पैशांची नाणी, एक रुपयाची नाणी आणि दोन रुपयांची नाणी. अशी कमीत कमी एकूण किती नाणी मिळतील ?

(A) 4 (B) 3 (C) 5 (D) 6

28. एका आयताची लांबी 12 सेमी आणि रुंदी 8 सेमी असेल तर त्याची परिमिती किती ?

(A) 20 सेमी (B) 40 सेमी (C) 8 सेमी (D) 16 सेमी

29. रिटाचे वडील 23-2-2024 रोजी प्रवासास गेले व 2-4-2024 रोजी घरी परत आले. तर ते प्रवासानिमित्त किती दिवस घराबाहेर होते ?

(A) 38 दिवस (B) 37 दिवस (C) 36 दिवस (D) 39 दिवस

30. गुणाकार करा :- $593 \times 37$

(A) 21,931 (B) 20,941 (C) 21,941 (D) 20,931

31. अनघाकडे 60 रुपये होते. तिने त्यापैकी पाव भाग रक्कम तिच्या भावाला दिली. तर तिच्या भावाला किती रक्कम मिळाली ?

(A) 45 रुपये (B) 15 रुपये (C) 12 रुपये (D) 30 रुपये

32. पावणे पंधरा हा अपूर्णांक कसा लिहिला जातो?

(A) $14\frac{3}{4}$ (B) $14\frac{1}{4}$ (C) $14\frac{1}{2}$ (D) यापैकी नाही.

33. एका मुलाने स्वतःच्या वाढदिवशी प्रत्येक वर्गमित्रास 250 ग्रॅम मिठाईचा एकेक पुडा दिला. जर एकूण मिठाई 14 किलोग्रॅम असेल, तर त्याचे एकूण वर्गमित्र किती ?

(A) 60 (B) 85 (C) 70 (D) 56

34. एका वर्तुळाची सर्वात मोठी जीवा 15 सेमी लांबीची आहे, तर त्या वर्तुळाचा व्यास किती असेल ?

(A) 12 सेमी (B) 15 सेमी (C) 7.5 सेमी (D) यांपैकी नाही

35. 28 फेब्रुवारी 2024 रोजी शुक्रवार होता. तर 1 फेब्रुवारी 2024 रोजी कोणता वार होता ?

(A) शनिवार (B) रविवार (C) शुक्रवार (D) गुरुवार

36. अशोकजवळ दहा रुपयांच्या 5 नोटा, पाच रुपयांच्या 3 नोटा, दोन रुपयांच्या 2 नोटा, एका रुपयाची 1 नोट, आणि 50 पैशांची तीन नाणी असतील, तर अशोकजवळची एकूण रक्कम किती?

(A) 61 रु. 50 पैसे (B) 71 रु. 50 पैसे (C) 72 रु. 50 पैसे (D) 62 रु. 50 पैसे

37. 1 मीटर लांबीची रिबिन 11 समान भागांत कापली तर किती रिबिन उरली ?

(A) 9 सेमी (B) 9 मीटर (C) 1 सेमी (D) 10 सेमी

38. एका आगगाडीने सकाळी सव्वा आठ वाजता पुणे सोडले, आणि ती दुपारी पाऊण वाजता मुंबईत पोहोचली. तर तिचा प्रवास किती वेळात पूर्ण झाला ?

(A) 5 तास (B) 4 तास (C) $4\frac{1}{2}$ तास (D) $3\frac{1}{2}$ तास

39. अमरने एक टेबल 8,530 रुपयांना विकत घेतले व एक खुर्ची 5,750 रुपयांना विकत घेतली. तर टेबलाला खुर्चीपेक्षा किती रुपये जास्त द्यावे लागले ?

(A) ₹ 3,230 (B) ₹ 3,880 (C) ₹ 2,780 (D) यांपैकी नाही

40. आश्रमातील मुलांना वाटण्यासाठी माईंनी 8 लिटर दूध आणले व 200 मिलिलिटर दूध प्रत्येक मुलाला दिले, तर आश्रमात एकूण किती मुले होती?

(A) 32 (B) 40 (C) 64 (D) 16

41. 3,500 रुपयांपैकी, $\frac{2}{5}$ भाग रक्कम राजूला दिली. उरलेली रक्कम रामला दिली. तर रामला किती रक्कम मिळाली ?

(A) 1,400 रु. (B) 2,100 रु. (C) 2,800 रु. (D) 1,100 रु.

42. एका शाळेत 2,512 मुलगे व 1,818 मुली आहेत. तर शाळेतील एकूण विद्यार्थी किती ?

(A) 3,030 (B) 4,320 (C) 3,320 (D) 4,330

43. वृक्षारोपणाच्या कार्यक्रमात, 4,800 गुलमोहराची झाडे आणि 2,707 निलगिरीची झाडे लावली. तर निलगिरीच्या झाडांपेक्षा गुलमोहराची किती झाडे अधिक लावली ?

(A) 2,903 (B) 2,390 (C) 2,093 (D) 2,309

44. खालीलपैकी कोणत्या आकृत्या रेखांकित अर्धा भाग दाखवितात ?


a


b


c


d

(A) a, d (B) a, b (C) b, d (D) a, b, d

45. सोडवा -

5,170 + 3,786 − 7,294 = ?

(A) 1,762 (B) 1,642 (C) 5,910 (D) 1,662

46. एका संख्येस 7 ने भागले असता, भागाकार 16 येतो व बाकी 3 उरते, तर ती संख्या शोधा.

(A) 55 (B) 123 (C) 115 (D) यांपैकी नाही.

47. सोमूने 2 किलो बटाटे, सव्वा किलो कांदे, पाऊण किलो टोमॅटो विकत घेतले. तर भाजीचे एकूण वजन किती ?

(A) 4 किलो (B) पावणेचार किलो (C) 5 किलो (D) 3 किलो 250 ग्रॅम

48. शेजारील आकृतीत, जास्तीत जास्त किती चौरस आहेत ?



(A) 9 (B) 13 (C) 14 (D) 10

49 & 50 एका वाचनालयात तीन भाषांतील पुस्तके आहेत. (प्रत्येक △ =100 पुस्तके)

खालील तक्ता पाहून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.

| भाषा / पुस्तके | पुस्तकांची संख्या |
|---|---|
| मराठी | △△△△△△△△ |
| हिन्दी | △△△△△△ |
| इंग्रजी | △△△△△△△△△△△ |

49. मराठीपेक्षा इंग्रजी पुस्तके कितीने जास्त आहेत ?

(A) 30 (B) 300 (C) 3,000 (D) 400

50. वाचनालयातील एकूण पुस्तके किती ?

(A) 2,500 (B) 25,000 (C) 2,400 (D) 3,000

******